TO – C.G.M.(P)

साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.८३०/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
मुंबई - ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.१६ दिनांक १/२/२००६

विषय : मुख्यालयाच्या ठिकाणी रहाण्याबाबत

संदर्भ : १) परिपत्रक क्र.MZ/Misc/Spe/6914 dtd.16/7/1990
२) परिपत्रक क्र.MZ/Misc/Spe/31867 dtd.24/9/1990
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.३८५ दिनांक २९/३/२००३
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.४४६ दिनांक २८/१/२००५

.....

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांद्वारे कर्मचा-यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी रहाण्याबाबतच्या सूचना वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील संचालन व सुव्यवस्था विभागात काम करणारे काही अभियंते, तारमार्गावर काम करणारा कर्मचारीवृंद तसेच महत्वाच्या पदावर काम करणारे इतर अधिकारी अद्यापही त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत.

२. जे कर्मचारी त्यांचे मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत त्याबाबत संदर्भीय परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे वेळोवेळी सविस्तर सूचना दिलेल्या आहेत :-

i) परिपत्रक क्र.६९१४ दि.१६.७.१९९० व परिपत्रक क्र.३१८६७ दि.२४.९.१९९० अन्वये सर्व कार्यकारी अभियंत्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील कार्यरत कर्मचा-यांच्या नांवे व्यक्तिशः पत्रे लिहून त्यांना मुख्यालयाच्या ठिकाणी रहाणेबाबतच्या सूचना द्याव्यात. जे कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत त्यांचे मासिक वेतन काढण्यात येऊ नये अशा सूचना दिल्या आहेत. तसेच, प्रत्येक कर्मचा-याने त्याचे मुख्यालयात रहात असल्याबाबतचे प्रमाणपत्र व त्यासोबत स्थानिक वास्तव्याचा पत्ता देणे बंधनकारक करुन असे प्रमाणपत्र संबंधित नियंत्रण अधिका-याने पडताळून खात्री केल्यानंतरच वेतन काढण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. शिवाय परिमंडल स्तरावरील तपासणी पथकांनी त्यांचे तपासणी अहवालात मुख्यालयात न रहाणा-या कर्मचा-यांची नावे समाविष्ट करण्याच्या सूचना सुध्दा देण्यात आल्या होत्या.

ii) प्रशासकीय परिपत्रक क्र.३८५ दि.२९.३.२००३ अन्वये अशाही सूचना दिल्या आहेत की जे कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत अथवा सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी न घेता मुख्यालय सोडतात अशी कृती सेवा विनियमातील अनुसूची – 'ख' अनुसार गैरकृत्य मानावे व असे गैरकृत्य करणा-या कर्मचा-याविरुध्द शिस्तभंग

कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे संबंधित कार्यालय प्रमुखाने त्याच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे रहाण्याच्या ठिकाणांची नोंद करण्यासाठी नोंदवही ठेवावी व ती नोंदवही वेळोवेळी अद्ययावत करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. नियंत्रण अधिका-यांनी अनपेक्षित तपासणी (Surprise check) करुन मुख्यालयाच्या ठिकाणी न रहाणा-या कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगांतर्गत संक्षिप्त कार्यवाही करावी आणि अशा कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहितांना त्याची नोंद त्याच्या गोपनीय अहवालात सुध्दा करावी असेही निर्देश दिले होते. सदर सूचनांचे काटेकोर पालन करुन सूचनांचे उल्लंघन करणा-या कर्मचा-यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश सुध्दा प्रशासकीय परिपत्रक क्र.४४६ दि.२८.१.२००५ अन्वये देण्यात आले होते.

३. सद्यस्थितीत वीजेची मागणी व वीज पुरवठा यांचा मेळ स्थापित करण्याकरिता भार नियमनाव्यतिरीक्त अन्य कारणामुळे ऐनवेळी वीज पुरवठा खंडीत झाल्यास तो पुन्हा सुरळीत करण्याकरिता संबंधित अधिकारी व कर्मचारीवृंदाची त्या ठिकाणी तात्काळ उपस्थिती असणे आवश्यक आहे. विद्युत पुरवठयातील दोषांबाबत तक्रार करण्यासाठी आलेल्या वीज ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेणे व त्यांची नोंद घेणे यासाठी शाखा प्रमुख व तारमार्ग कर्मचारीवर्ग मुख्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध नसतो असे निदर्शनास आले आहे. परिणामी, वीज पुरवठा सुरळीत होण्यास बराच कालावधी लागतो. तसेच अल्पकालावधीत वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास त्याचा विपरीत परिणाम वितरण कंपनीच्या महसुलावरही होतो. वीज वितरणाचे काम हे अत्यावश्यक सेवेत गणले जात असल्याने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे मुख्यालयाचे ठिकाणी रहाणे अत्यंत जरुरीचे आहे.

४. म्हणून या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा निदेश देण्यात येत आहेत की त्यांनी आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याची गंभीर दखल घेऊन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच नियंत्रण अधिका-यांनाही सूचना देण्यात येत आहेत की वरील परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविलेल्या परिपत्रकानुसार पगार न काढणे, स्थानिक पत्त्यांची नोंद वही ठेवणे, अनपेक्षित तपासणी करणे इ. वेळोवेळी दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी.

५. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील सर्व परिमंडल, मंडल, विभाग, उप विभाग व शाखा कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या स्तरावर बैठका घेऊन सदर परिपत्रक त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे व त्यात दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन होईल याची खातरजमा करावी.

( संजय भाटिया )
व्यवस्थापकीय संचालक

प्रत :
म.रा.वी.वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.